भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

आरबीआय २०११-१२/२५२
डीबीओडी.बीपी.बीसी.क्र. ५०/२१.०१.००१/२०११-१२

नोव्हेंबर ४, २०११

सर्व अनुसूचित बँकांचे
सर्व अनुसूचित वाणिज्य बँकांचे अध्येक्ष
मुख्य कार्यकारी अधिकारी (आरबीआय सोडून)

महोदय,

**अकाऊंट पेयी चेक्स गोळा करणे - तिसऱ्या पक्षाच्या खात्यात रक्कम जमा करण्यास मनाई**

कृपया आमचे परिपत्रक डीबीओडी.बीपी.बीसी.क्र.५६/२१.०१.००१/२००५-०६ दिनांक जानेवारी २३, २००६ चा संदर्भ घ्यावा. त्यानुसार, आदेशित (पेयी) सोडून अन्य कोणत्याही बँकांना मनाई करण्यात आली आहे.

२. ह्या सूचना पाळल्या न जाण्याबाबतच्या प्रश्नांचा विचार करता, आम्ही पुनश्च सांगत आहोत की, वरील परिपत्रकात दिलेल्या सूचनांचे बँकांनी काटेकोरपणे पालन करावे आणि आदेशित सोडल्यास अन्य कोणत्याही व्यक्तीसाठी अकाउंट पेयी चेक्स त्यांनी गोळा करु नये.

३. अकाउंट पेयी चेक्स गोळा करण्यामधील, सहकारी पत सोसायट्यांच्या सभासदांना येत असलेल्या अडचणी कमी करण्यासाठी, आमचे परिपत्रक डीबीओडी.बीपी.बीसी.क्र.४७/२१.०१.००१/२०१०-११ दिनांक ऑक्टोंबर १, २०१० अन्वये सवलत देण्यात आली होती ह्या परिपत्रकानुसार, अशा चेक्सचे आदेशिती, अशा सहकारी पत सोसायट्यांचे ग्राहक असलेल्या त्यांच्या ग्राहकांच्या खात्यावर, रु ५०,०००/- पेक्षा अधिक नसलेले अकाउंट पेयी चेक्स गोळा करण्याबाबत बँका विचार करु शकतात. वरील सवलत वरील ऑक्टोंबर १, २०१० मध्ये दिलेल्या अटींनुसार सुरु राहील.

४. बँकांनी नोंद घ्यावी की वरील सवलत व मनाई ड्राफ्ट्स, पेऑर्डर्स व बँकर्स चेक्सनाही लागु असेल.

आपला,

(दीपक सिंघल)
प्रभारी मुख्य महाव्यवस्थापक